स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
मानव विज्ञान विद्याशाखा अंतर्गत समाजशास्त्र विषयातील
पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

* संशोधन विषय *

बंजारा जातीतील सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनाचा समाजशास्त्रीय अभ्यास (विशेष संदर्भ : नांदेड जिल्हा)

:: संशोधक ::

जीवन खुशालराव शिंदे

:: मार्गदर्शक ::

प्रा.डॉ.सुरेश व्हि. धनवडे

समाशास्त्र विभागप्रमुख

कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,

शंकरनगर, ता.बिलोली जि. नांदेड.

संशोधन केंद्र

सामाजिक शास्त्रे संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सप्टेंबर : २०२३

बंजारा जातीतील सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनाचा समाजशास्त्रीय अभ्यास विशेष संदर्भ : नांदेड जिल्हा

प्रस्तावना —

जगातल्या अनेक राष्ट्रापैकी भारत हा एक आगळा वेगळा राष्ट्र आहे. की ज्या देशाला तीन समुद्राचा स्पर्श झालेला आहे आणि उतुंग अशा हिमालय पर्वताने कव्हेत घेतलेला आहे. असा भारतीय समाजाचा वैभवशाली इतिहास आहे. याच पवित्र भुमीत संस्कृति मोठ्या थाटा माटाने नांदताना दिसते आहे. अशा विविधतेने नटलेल्या या देशात अनेक धर्म जाती पंथ वंशाचे लोक जीवन जगतांना दिसतात. त्यापैकीच एक असलेला म्हणजे बंजारा समाज आहे.

पौराणिक काळापासून बंजारा समाजाची ओळख भारत मातेच्या लेकरांना आहे. एवढेच नव्हे तर सिंधु संस्कृति बौद्धकाळ, मोघल काळ आणि ब्रिटीशांच्या काळात सुद्धा या समाजाचे अस्तित्व दिसते याचा अर्थ या समाजाला हजारो वर्षांचा इतिहास आहे. बंजारा समाज हा भारतीय समाज व्यवस्थेचा एक महत्त्वाचा घटक आहे. या समाजाने आपली संस्कृति व एकच ‘गोरमाटी’ भाषा आजतागायत जपुन ठेवलेली आहे. भारत देशात जवळपास ४ कोटी एवढी लोकसंख्या या समाजाची असून ती जवळ-जवळ १८ राज्यांमध्ये दिसून येते.

असा भारतातील अनेक दुर्बल घटकांपैकी एक असणारे बंजारा जमाती आहेत. प्राचीन काळापासून हा भटका, उपेक्षीत समाज टिचभर पोटाची खळगी भरण्यासाठी डोंगर, दऱ्याखोऱ्यात, कडे-कपारीत, ओसाड माळराणावर गावापासून दूर अशा अंतरावर विमुक्त असलेला दिसून येतो.

बंजारा या शब्दाची उत्पत्ती वन जा रा अशा अक्षरापासून झालेली आहे. वनात राहणारी किंवा जाणारी जमात म्हणजे बंजारा समाज होय वंजारा चा अपभ्रंष होवुन बंजारा असा शब्द आलेला आहे. त्याच प्रमाणे उर्दू भाषेमध्ये बंजाराचा अर्थ पडीत जमीन असाहोतो. पडीत जमीनीवर राहणारा म्हणजे बंजारा समाज होय. अरबी भाषेत गाणप्रिय भटक्या असा याचा अर्थ होतो या समाजाचे मुळ राज्यस्थान

मध्ये असून तो क्षत्रिय वर्णाचा आहे. तिथल्या महाराणा प्रताप राजाने अशा भटक्या समाजाला म्हणजेच बंजारा समाजाला मोठा राजाश्रय दिला. कालांतराने या जमाती मोघालांच्या काळत सर्व दुर पसरल्या आणि महाराष्ट्रात तर बंजारा समाजाची संख्या मोठ्या प्रमाणात निर्माण झाली. इथल्या विदर्भ, मराठवाडा या विभागात या समाजाची संख्या मोठ्या प्रमाणात दिसते.

बंजारा समाजाचे स्वरुप :

१) बौद्ध काळ :-

बौद्ध काळात बंजारा समाज हा अत्यंत जवळचा ओळखला जाणारा होता. त्यांना नायक नायकडा, गोर, लमान अशा वेगवेगळ्या नावाने ओळखले जात होते. या समाजाची मानसे तेजस्वी पराक्रमी व अथक परिश्रम करणारे जिद्दी मानसे होती. शिक्षणाच्या माध्यमातून व स्वकर्तत्वातून दुर्भाग्य समाजाने आपले भाग्य उदयास आणले. तसेच गौतम बुद्ध व बंजारा समाज यांच्यामध्ये बहुतांशी प्रमाणात साम्यता आढळुन येते कारण अनेक बंजारा लोकांनी बुद्धांचे अणुकरण करुन बौद्ध धर्माचा स्विकार केला. म्हणजेच भिखु व भिखुणी तयार झाले.

२) मोघल काळ :-

मोघल काळात युद्धांच्या वेळी सैन्यांना रसद पुरविण्याचे काम बंजारा समाज करीत असायचा प्रसंगी तो वीर योद्धांचे देखील काम करायचा डोक्यावर बांधलेला फेटा आणि त्यावर लिंबाच्या डहाळ्याचा चढवलेला तुरा असायचा अशी त्यांची ओळख होती. हा समाज तांडा वस्ती, वाडी व जंगलात रहात होता या समाजाने नंदी बैलाच्या पाठीवर मिटाच्या गोण्या टाकून तो मिठाचा व्यवसाय करीत असायचा मीठाला लवन म्हणतात. त्यावरुनच लवनाचा व्यापार करणारे म्हणजे लमान, लमाणी, लंबाडा, गोरबंजारा अशी त्यांची ओळख होत गेली.

३) शिवकाळ :-

शिवकाळ म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांचा काळ होय त्या काळात महाराजांनी बंजारा समाजाचा आदर करीत असायचे, त्यांची भाषा, पोषाख, वेशभुषा, खाणे-पिणे इत्यादी जीवनपद्धतीचा व संस्कृतिचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला त्यामुळे हा समाज सुखाने जीवन जगत असायचा त्यामुळेच या समाजातील लोकांच्या स्त्रि-पुरूषांना संरक्षण मिळत असायचे म्हणुन शिवकाळ व बंजारा समाजाचे नाते घनिष्ठ बनत गेले त्यामुळेच हा माणुस कांही वेळा युद्ध प्रसंगी सहकार्याची भुमिका वटवित असायचा.

४) ब्रिटीश काळ :-

ब्रिटीश काळ म्हणजे इंग्रजांचा काळ असुन त्या काळात रेल्वे मार्ग मोठ्या प्रमाणात चालु झाले तेंव्हा जंगल तोड होवु लागली परंतु जंगलाचा राजा असलेल्या भटक्या जमातीचा प्रश्न ऐरणिवर आला. मग तो समाज इंग्रजांना विरोध करू लागला. तेंव्हा इंग्रजांनी १८१८ ला जंगलातील लाकडे तोडण्यास मनाई असणारा कायदा केला. तसेच १८७१ ला कायदा करुन लमाण जातीवर कायम स्वरुपी चोरटा व गुन्हेगारीचा शिक्का मारला.

महाराष्ट्राच्या पवित्र भुमित गोदावरीच्या काठावर नांदेड जिल्ह्या आहे. या जिल्ह्यात बंजारा समाजाचे शेकडो तांडे आहेत आणि जवळपास २,००,००० एवढी लोक संख्या आहे. तिथल्या मातीचा लालसर रंग असल्यामुळे जंगल मोठ्या प्रमाणात दिसतो. जसे निसर्ग सौंदर्याची खानच वाटते. याच माळराणावर वस्ती करुन स्वतंत्र जीवन जगणारा म्हणजे बंजारा समाज आहे. त्यांच्या चाली रिती पेहराव, प्रथा, परंपरा, लोकगीत, लोकनृत्य, लोककला, भाषा, खाणे-पिणे इत्यादी २१ व्या शतकात धावत्या युगात नांदेड जिल्ह्यातील बंजारा समाजाचा कसा सामाजिक व सांस्कृतिक बदल होत गेला याचा अभ्यास करण्यासाठी मी माझ्या मार्गदर्शकाच्या सहमतीने हा विषय संशोधनासाठी निवडलेला आहे.

संशोधनाचे महत्त्व :-

बंजारा समाजाची ओळख सिंधु संस्कृतित गोर समाज म्हणुन आहे. या समाजाच्या संस्कृती आणि सभ्यतेचा विकास सिंधु नदिच्या परिसरात बसलेल्या हडप्पा व मोहंजो दडो या दबलेल्या शहरात झाल्याचे दिसते. तेथील उत्खननात सापडलेल्या ९० टक्के अवशेषावरुन ही संस्कृती १०० टक्के गोर संस्कृतिच असल्याचे दिसते.

गोर समाजाची जीवनशैली अतिशय मेहनती, काटक, पशुपालक, स्वच्छंदी, निसर्ग प्रेमी, शिकारी, व्यापारी, श्रृंगारप्रेमी व समाजवादी आचार विचार असलेली दिसते.

या समाजाने मराठवाडा मुक्तीसंग्रामातील स्वामी रामानंद तीर्थांसोबत निजाम राजवटीच्या विरोधात एकजुट होवुन लढण्याचे काम केलेले होते. श्री संत सेवालाल महाराजांचे शौर्य व आदर्श विचार समाजापर्यंत पोहचविण्याची नितांत गरज वाटते.

बंजारा समाजाने अनेक शैक्षणिक सवलती घेवुन शिक्षणक्षेत्रात व साहित्य क्षेत्रात एक क्रांतीच केलेली दिसते. त्याचे एक उदाहरण ५ डिसेंबर १९६३ साली विमुक्त वर्गाचे वसंतराव नाईक हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झालेले होते. त्यांनी देशमुख समिती शिफारशी प्रमाणे शिक्षण व नौकरी व्यवसायात ४ टक्के सवलती या समाजासाठी जाहिर केलेल्या होत्या. तसेच आश्रमशाळा व वसतिगृह हि योजना सुरू केली. असा त्या समाजाने अमुलाग्र बदल केला. म्हणुन या समाजाची महत्त्व खुप आहे.

बंजारा समाज काळाच्या ओघात विकासाचे पाऊले टाकीत जीवन प्रवासाची एक दिशा निश्चित केलील. विज निर्मीती, रस्ते बांधणी, आरोग्य, शिक्षण, वाहतुक, अशा कित्येक क्षेत्रात प्रगती आणि यशाचे शिखर गाठलेले आहे.

उद्देश :-

१) गावापासून दुर असणाऱ्या बंजारा समाजाची ओळख करुन घेणे.

२) माळराणावर असणाऱ्या समाचा सांस्कृतिक बदल लक्षात घेणे.

३) शैक्षणिक सामाजिक बदलांचा तंतोतंत अभ्यास लक्षात घेणे.

४) अशा भटक्या बंजारा समाजाचा सखोल अभ्यास करुन त्यावर उपाय योजना सुचविणे असा आहे.

गृहितकृत्ये :-

१) आधुनिक काळात समाजाच्या संस्कृतीत बदल होणे आवश्यक आहे.

२) भटक्या समाजाला गावात व शहरात वास्तव्य मिळण्याची गरज आहे.

३) शैक्षणिक व सामाजिक बदला मुळे गुन्हेगार समजल्या जाणाऱ्या समाजाला माणसासारखे वागता येईल.

४) अज्ञानी असणाऱ्या बंजारा समाजाचे नांव आधुनिक इतिहासाच्या पटलावर येऊ शकेल.

संशोधन आराखडा

१) सर्वेक्षण पद्धती :-

बंजारा जमातीच्या अभ्यासासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धती म्हणजे सर्वेक्षण पद्धत आहे. तीचा जास्तीत जास्त प्रमाणात वापर केला जातो. वर्तमान काळातील स्थिती जाणुन घेण्यासाठी या पद्धतीचा उपयोग गुणात्मक पद्धतीने केला आहे.

भारतात असणारा बंजारा समाज हा बऱ्याच अंशी प्रमाणात दिसून येतो. भारतीय राज्यघटनेत त्याचा उल्लेख विमुक्त जमाती असा करण्यात आला आहे. असा डोंगर, दऱ्या, कडे, कपारी, ओसाड राणात राहणारा भटक्या जमातीचा यांचा अभ्यास करणे मला आवश्यक वाटते. कारण ती एक माणसेच आहेत. परंतू आर्थिक परिस्थितीने पिचलेले असल्यामुळे त्यांच्यावर अनेकांनी अन्याय केला तो समाज अन्यायाखाली भरडुन निघाला.अशा जमातीचे वर्णन करण्यासाठी मी सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला त्यातुनच त्यांचे गुण शोधले आहे.

भारत स्वातंत्र्यानंतर ब्रिटीशांच्या तावडीतून मुक्त झाला अनेक प्रकारच्या त्यांना सवलती मिळत गेल्या. त्यावर त्यांनी स्वत:च्या मेहनतीवर बुद्धी कौशल्याच्या जोरावर अनेक क्षेत्रात पाऊल ठेवले. अशा सामाजिक सांस्कृतिक बदलांचा सर्वेक्षणाच्या माध्यमातून आपणास सखोलपणे करता येतो.

२) क्षेत्रीय अध्ययन

एखादे संशोधन महाविद्यालयात किंवा प्रयोग शाळेत न करता नैसर्गिक वातावरणात केले जाते त्यास क्षेत्रीय अध्येयन असे म्हणतात. मी संशोधक प्रत्यक्ष त्या क्षेत्रात जावुन अभ्यास केला आहे आणि त्या ठिकाणच्या व्यक्तीनुसार व परिस्थितीनुसार नोंदी घेवुन माहिती गोळा करणार असुन संकलनासाठी हि गुणात्मक पद्धती वापरणार आहे. निसर्गाच्या सानिध्यात असणाऱ्या लोकांचे निरीक्षण करणे. त्यांच्याशी संवाद साधने त्यांची भाषा

समजुन घेणे. मुलाखत प्रश्नावली अनुसूची या पद्धतीचा वापर करणार आहे. आणि झालेल्या बदलांचा अभ्यास हा योग्य ठरणार आहे.

३) नमुना निवड

नमुना हा शब्द नवीन नसुन एखाद्या वस्तुस्थितीचे अनुमान काढणे, दैनंदिन व्यवहारातही हे अनुभवास येते. म्हणजे एक प्रकारची चाचणीस असते. बंजारा समाजाचा अभ्यास करण्यासाठी नांदेड जिल्ह्यातील बंजारा जमातीची निवड नमुना म्हणुन केलेली आहे. एकुणच समग्रातून काही भागांची निवड करणार आहे. जसे सिता वरुन भाताची परिक्षा असे संशोधन करणे होय बंजारा जमातीचे गुणात्मक वर्णन करणे होय.

प्रस्तुत संशोधनात माहिती संकलित करण्यासाठी वेगवेगळ्या तथ्य संकलन साधनांचा वापर करावा लागतो. त्यामध्ये निरीक्षण, मुलाखत, अनुसूची या तंत्राचा वापर करुन नांदेड जिल्ह्यातील २५० उत्तरदाता नमिुन्याची निवड करणार आहे. मिळालेली माहिती संकलित करुन संशोधनासाठी तीचा उपयोग होवु शकतो.

४)तथ्य संकलन

तथ्य संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा वापर करणार आहे. यासाठी प्राथमिक तथ्य संकलन पद्धतीतील मुलाखत अनुसूची तंत्राचा वापर करणार आहे.

सारांश :

सदरील संशोधन आराखडा हा नांदेड जिल्ह्यातील बंजारा जमातीचा सामाजिक, सांस्कृतिक बदलाचा परिवर्तनाचा अभ्यास करणारा असुन ह्या समाजाने कित्येक पिढ्यांपासून भटकंती करित वाडी, तांडा, वस्तीवर स्थायिक झाले गाव आणि शहरापासून कोसो दुर अंतरावर जीवन जगणाऱ्या या समाजाने आज कुठेतरी माणसात येवुन आपल्या जगण्याच्या पद्धतीत बदल केला. असा त्यांच्यात झालेल्या समाजिक व सांस्कृतिक बदलाचा अभ्यास सविस्तर पणे मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

प्रकरणांची रुपरेषा

१) प्रस्तावना

२) संशोधनाचे स्वरुप

३) संशोधनाचे महत्त्व

४) उद्देश

५) गृहितकृत्य

६) संशोधन आराखडा

७) सारांश

संदर्भ सूची :-

१) भारतीय समाज – प्रा.भा.कि.खडसे.

२) भारतीय समाजव्यवस्था - डॉ.एम.जी. कुलकर्णी

३) भारतीय समाज रचना – प्राध्यापक गुरुनाथ नाडगोंडे

४) भारतीय समाज संस्कृती – डॉ.गोविंद गारे

५) सामाजिक संस्था – प्रा.बारबिंड

६) भारतातील सामाजिक समस्या – डॉ.विलास संगवे
पाप्युलर, प्रकाशन मुंबई

७) भारतीय समाज संरचना – डॉ. प्रदिप आगलावे
साईनाथ प्रकाशन नागपूर

संशोधक
प्रा.जीवन खुशालराव शिंदे
सौ.मंजुळाबाई ज्यु.कॉलेज खतगाव
ता.बिलोली जि.नांदेड

मार्गदर्शक
प्रा.डॉ.सुरेश व्हि. धनवडे
समाशास्त्र विभागप्रमुख
कला, वाणिज्य आणि विज्ञान
महाविद्यालय, शंकरनगर,
ता.बिलोली जि. नांदेड.